# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### ठाणे, कळवा आणि मुंब्रा या शहरातील गरीब वस्तीतील लहान मुलांना पळविण्याच्या घटनेत होणारी वाढ

**(१) २४ (१५-०१-२०१५). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कळवा आणि मुंब्रा या शहरातील गरीब वस्तीतील लहान मुलांना पळविण्याच्या घटनेत वाढ झाल्याने ठाणे, कळवा आणि मुंब्रा या शहरामध्ये लहान मुले पळविणारी एक टोळी सक्रिय असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुले चोरणा-या टोळीला अटकाव करण्यासाठी पोलीस यंत्रणेने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही

ठाणे कळवा आणि मुंब्रा या शहरामध्ये लहान मुले पळविणारी एक टोळी सक्रिय असल्याने पोलीस तपासामध्ये निदर्शनास आलेले नाही.

(२) सदर घटनांबाबत तपास लावण्याकरिता पोलीस ठाणे स्तरावर स्वतंत्र पथके तयार करण्यात आलेली असून सदर पथकामार्फत शोध घेण्यात येतो त्याचप्रमाणे ठाणे पोलीस आयुक्तालयास बालकांचे संरक्षण करण्याकरिता स्वतंत्र बालसंरक्षण पथक तैनात करण्यात आलेले असून, सदर पथकाकडून हरविलेल्या बालकांचा कसोशीने शोध घेतला जातो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यातील तब्बल २५ टक्के बसगाड्या गॅरजेमध्ये दुरुस्तीसाठी पडून असल्याबाबत**

**(२) १८१ (२३-१२-२०१४). श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यातील तब्बल २५ टक्के बसगाड्या हया प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळेच गॅरजेमध्ये दुरुस्तीसाठी पडून असल्याची धक्कादायक बाब ही बेस्ट समितीच्या बैठकीत दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरी नादुरुस्त बसगाड्याची दुरुस्ती कामे ही खाजगी कंपन्याकडून न घेता ती आगारातील कामगारांनाच देण्यात यावी अशी मागणी सामाजिक नेत्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती बसगाड्या तातडीने दुरुस्त होणेबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. बेस्ट उपक्रमाच्या १०० बसगाडयांच्या सांगाडे दुरुस्तीचे काम करण्याबाबतचा प्रस्ताव बेस्ट समितीसमोर सादर करण्यात आला होता. त्यावेळी बेस्ट उपक्रमाकडे उपलब्ध असलेल्या साधनसामुग्री व कर्मचारी यांच्याकडून सदर दुरुस्ती काम करुन घेता येईल का याबाबतची पाहणी करण्याबाबतची सूचना बेस्ट उपक्रमांव्दारे बेस्ट समिती सभेत चर्चेदरम्यान करण्यात आली होती. तथापि सदर सूचना तांत्रिकदृष्टया व्यवहार्य नसल्याचे बेस्ट प्रशासनाने कळविले आहे.

(३), (४) व (५) बेस्ट उपक्रमाने १०० बसगाडयांच्या दुरुस्तीसाठी निविदा मागविलेली असून, कंत्राट बहाल करण्याचा प्रस्ताव बेस्ट समितीच्या मंजुरीसाठी सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या मंजुरीनंतर सदर बसगाडयांच्या दुरुस्तीचे काम त्वरीत करुन घेण्यात येणार आहे.

---

**राज्यातील गारपिटग्रस्त शेतक-यांच्या मुलांचे तंत्र शिक्षण थांबू नये म्हणून शैक्षणिक फी माफ करण्याच्या निर्णयाबाबत**

**(३) २०४४ (२२-१२-२०१४). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गारपिटग्रस्त शेतक-यांच्या मुलांचे तंत्र शिक्षण थांबू नये यासाठी सदर विद्यार्थ्यांना सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाची परिक्षा फी, प्रवेश फी व शैक्षणिक फी माफ करण्याचा सकारात्मक निर्णय घेण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागाकडून तसा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०५-२०१५) :** (१) परीक्षा शुल्कात सवलतीचा निर्णय महसूल व वन विभागामार्फत दिनांक २५.११.२०१४ ला घेण्यात आली आहे.

(२), (३) व (४) नाही.

---

## गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील मालगुजारी तलावाच्या समस्याबाबत

**(४) २२६४ (२२-१२-२०१४). श्री. विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया व भंडारा हे तलावाचे जिल्हे म्हणून गोंदिया व भंडारा जिल्ह्यांची ओळख कायम राहावी करीता मालगुजार तलावर खोल करुन गाळ मुक्त झाल्यास शेतीचे सिंचन वाढविण्यासाठी शासनाची काय उपाययोजना आहे काय,

(२) मालगुजारी तलावाची दुरुस्ती व खोली करणारे प्रस्ताव संबंधीत विभागाने शासनास सादर केले आहे काय,

(३) वरील प्रस्तावाकरीता शासनाने निधी देण्याची तरतूद केली आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०५-२०१५) :**(१) सद्य:स्थितीत शासनाची याबाबत विशेष उपाययोजना नाही तथापि, मनरेगा व महात्मा फुले जलसंधारण अभियान अंतर्गत माजी मालगुजारी तलाव खोलीकरणाची कामे प्रस्तावित आहे.

(२) होय, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०१३-१४ मध्ये एकूण ३४४ कामाचे माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीचे सविस्तर प्रकल्प अहवालास शासनाने मंजूरी दिली आहे.

(३) होय, केंद्र शासनाकडून उपलब्ध निधीच्या अनुषंगाने तरतूद करण्यात येईल.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील नगरपंचायत गुहागर हद्दीमध्ये निसर्ग मित्र व जेष्ठ समाजसेवक श्री.विश्वास खरे यांचा खून करण्यात आल्याबाबत

**(५) ३८९५ (१५-०१-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील नगरपंचायत गुहागर हद्दीमध्ये निसर्ग मित्र व जेष्ठ समाजसेवक श्री.विश्वास खरे यांचा दिनांक १ ऑक्टोबर २०१४ रोजी भरदिवसा निर्घृणरित्या खून करण्यात आल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खूनाने गुहागर सारख्या निसर्गरम्य पर्यटन स्थळी येणाऱ्या पर्यटकांमध्ये व शहरात राहणाऱ्या नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर खून करणाऱ्यांना पकडून त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१५) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) होय, प्रकरणी गुहागर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०१.१०.२०१४ रोजी गुरक्र.६७/२०१४, भादंविसं कलम ३०२, ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्यात दोन निष्पन्न आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

---

**टेंभू उपसा सिंचन योजनेचा सुधारित खर्च वाढल्याबाबत**

**(६) ५२३४ (०७-०४-२०१५). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभू उपसा सिंचन योजनेचा सुधारित खर्च ३ हजार ५३२ कोटीपर्यंत पोचल्याने त्याला प्रशासकीय मंजुरी देण्यासाठी राज्य शासनाकडे २००९-१० मध्ये पाठवलेले प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेंभू उपसा सिंचन योजनेची कामे थांबली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, टेंभू योजनेच्या सुधारित प्रस्तावास मंजुरी मिळविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्राप्त झालेला प्रस्ताव अद्ययावत दराने तयार करुन सादर करण्याच्या सूचना, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी १६९ कोटीचा उस्मानाबाद जिल्हा वार्षिक योजनेच्या रकमेपैकी ७३ कोटी रुपये अद्यापही शासनाने उपलब्ध करुन दिलेली नसल्याबाबत**

**(७) ५२५० (०९-०४-२०१५). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी १६९ कोटीचा उस्मानाबाद जिल्हा वार्षिक योजनेच्या रकमेपैकी ७३ कोटी रुपये अद्यापही शासनाने उपलब्ध करुन दिलेली नाही ही बाब नुकतीच उघड झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील विकास कामांना अप्राप्त निधीमुळे खीळ बसली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील विकास कामांना चालना देण्याकरिता उर्वरित निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१५) :** (१) ते (३) उस्मानाबाद जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना, सन २०१४-१५ अंतर्गत सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना मिळून एकूण रुपये १६९९१.१४ लक्ष इतका नियतव्यय मंजूर होता. त्यापैकी अनुसूचित जाती उपयोजनेचा रु.९.९९ कोटी इतका निधी सामाजिक न्याय विभागाकडून वितरीत झाला नाही. तथापि, यामुळे विकास कामे प्रलंबित आहेत असे नाही.

उस्मानाबाद जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना, सन २०१५-१६ अंतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेसाठी रु.५५७६.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

---

**विरार - बोळींज (ता.वसई) येथील मध्यम उत्पन्न गट योजनेबाबत**

**(८) ५४०१ (०७-०४-२०१५). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार - बोळींज (ता.वसई) येथील मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत सन २००४ मधील सोडतीत यशस्वी ठरलेल्या कोड क्र. २२१ मधील अर्जदारांना भूखंडाचा ताबा देण्यास हेतूपुरस्सरपणे टाळाटाळ केली जात आहे, असे संबंधित अर्जदारांनी दिनांक २९.१०.२०१४ रोजी सभापती, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, संबंधित अर्जदारांना भुखंडांचा ताबा देण्यास कोणती कार्यवाही आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२६-०५-२०१५) :** (१) होय, अर्जदाराचे निवेदन प्राप्त झाले असले तरी अर्जदाराने अर्जात नमूद केलेली वस्तुस्थिती खरी नाही.

(२), (३) व (४) विरार-बोळींज येथील अभिन्यासात सुधारणा करुन आवश्यक असलेले ४३ अतिरिक्त भूखंड दर्शवून अभिन्यास वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे मंजूरीकरीता सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर अभिन्यासास सुधारीत मंजूरी प्राप्त झाल्यानंतर तसेच लाभार्थ्यांनी नियमानुसार आवश्यक अधिमुल्याचा भरणा कोकण मंडळाकडे केल्यानंतर भूखंड वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**चंद्रपूर जिल्हयात खुल्या खाणीत होत असलेल्या ब्लॉस्टिंगबाबत**

**(९) ५४५९ (१०-०४-२०१५). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील वेकोलि माजरी क्षेत्रातील चारगाव, तेलवासा व कुणाडा या खुल्या खाणींनी चारगांव गावातील सभोवताली ढिगा-यांनी (ओव्हरबर्डन) वाढले असून या तिन्ही खाणीत ब्लास्टिंग होत असल्याने चारगांव गावातील प्रत्येक घरांना तडे गेले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १९ जानेवारी २०१५ रोजी मध्यरात्री २ वाजता चारगाव खाणीत ब्लॉस्टिंग केल्यामुळे चारगाव येथील रूपेश वाघाडे यांच्या घरावर रात्री २ वाजता कोसळल्याने एकाच परिवारातील १४ वर्षीय कु. मेघा विजय धाणकी हिचा जागीच मृत्यू झाला असून धर्मा दत्तू धाणकी आणि श्रीमती सुवर्णा विजय धाणकी हे जखमी झाल्यामुळे ग्रामस्थांनी त्यांना दवाखान्यात भरती केले असल्याचे घटना दिनांक १० जानेवारी २०१५ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खुल्या खाणीत होत असलेल्या ब्लॉस्टिंगमुळे चारगाव परिसरातील नागरीकांना अडचणी सहन करावा लागत असल्यामुळे नागरीकांच्या सुरक्षेविषयी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही,

(२) सदर घटना ब्लास्टींगमुळे घडली नसलेचे जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांनी कळविले आहे.

(३), (४) व (५) जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी कळविल्याप्रमाणे दि. १९ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या घटनेबाबत ग्रामपंचायत चारगांव यांचा पुनर्वसन करण्यासंबंधिचा प्रस्ताव तहसिलदार, भद्रावती यांचेकडून उपविभागीय अधिकारी, वरोरा यांचेकडे प्राप्त झालेला असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच झालेल्या नुकसानीबाबत उपाययोजना करण्यासंबंधी महाप्रबंधक, मे.वेस्टर्न कोल फिल्ड्स लि. माजरी क्षेत्र यांना तहसिलदार भद्रावती यांनी कळविले आहे.

---

**आदिवासी मुलींना हवाई झेप व मुलांसाठी हवाई सेवक (केबीन क्यू)**
**या अभिनव योजनांचा संस्थेलाच फायदा झाल्याबाबत**

**(१०) ५४६३ (१०-०४-२०१५). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागाच्या वतीने सन २००७-२००८ या वर्षापासून आदिवासी मुलींना हवाई झेप व मुलांसाठी हवाई सेवक (केबीन क्यू) ही अभिनव योजना सुरु करण्यात आली होती यात आदिवासी मुला-मुलीनां याचा फ़ायदा मिळण्यापेक्षा प्रशिक्षण केंद्र चालविण्या-या संस्थेलाच लाखो रुपयांचा फायदा मिळाला असल्याची माहिती दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विभागाची ही योजना शासनाने बंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही प्रशिक्षण केंद्र चालविण्या-या संस्था चालकांनी सदर योजना पुन्हा सुरु करण्यासाठी लॉबीगंच्या माध्यमातून सक्रिय झाले असल्याची माहिती निर्देशनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काही नविन नियम व शर्ती टाकून ही योजना नव्यारुपाने पुन्हा सुरु करण्याचा आदिवासी विभागाचा प्रयत्न असल्याने याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२६-०५-२०१५) :**(१), (२) व (३) केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत सन २००७-०८ या वर्षाकरिता अनुसूचित जमातीच्या २३० मुलींकरिता हवाई सुंदरी प्रशिक्षण व २५१ मुलांकरिता हवाई सेवकाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रति प्रशिक्षणार्थी रु.१.०० लक्ष याप्रमाणे रु.४८१.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला होता.

त्यानुषंगाने अप्पर आयुक्त, नाशिक व ठाणे यांनी प्रति प्रशिक्षणार्थी रु.८५,५००/- या प्रमाणे अनुक्रमे २०७ व १३० प्रशिक्षणार्थी तसेच अपर आयुक्त, अमरावती यांनी रु.७८,०००/- याप्रमाणे २७ प्रशिक्षणार्थी याप्रमाणे एकूण ३६४ प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे प्रशिक्षण केंद्र चालविणा-या संस्थांना लाभ होईल यादृष्टीने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) राज्यातील अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना विमानसेवेत एअर हॉस्टेस, कॅबिन क्यु, हॉटेल व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थापन, कस्टमर केअर प्रशिक्षणाची योजना राज्य शासनाच्या निधीतून राबविण्याचा निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कडवा (जि.नाशिक) धरण उपविभागांतर्गत सुळे डाव्या कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(११) ५५२१ (०६-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडवा (जि.नाशिक) धरण उपविभागांतर्गत सुळे डाव्या कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालव्याच्या निकृष्ट कामकाजाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपळखुटा (ता.जि. हिंगोली) येथील पाणीपुरवठा योजनेसाठी असलेला निधी शिल्लक नसल्याबाबत**

**(१२) ५६०९ (०७-०४-२०१५). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळखुटा (ता.जि. हिंगोली) येथील पाणी पुरवठा योजनेसाठी निधी देण्यात आला होता मुल्यांकनानंतर समितीच्या खात्यावर रुपये ८७ हजार शिल्लक असणे आवश्यक होते मात्र समितीच्या खात्यावर सदर रक्कम शिल्लक नसल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावामध्ये पाणी पुरवठा योजना बंद असल्याने पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई करण्याबाबत व पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१५) :** (१) होय.

(२) हे खरे नाही. गावात ३ विद्युत पंपाद्वारे व ४ हातपंपाद्वारे नियमित पाणीपुरवठा चालू आहे.

(३) होय. दिनांक २२.१२.२०१४ रोजी चौकशी करण्यात आली असून ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समितीकडे योजनेची अंतिम देयकाची वसूलीपात्र रक्कम शासन खाती जमा करण्याबाबत दिनांक १.१.२०१५ रोजी अध्यक्ष/सचिव दोघांना पत्र देण्यात आले आहे व पाणी पुरवठा सुरळीत सुरु करण्यासाठी ग्रामपंचायतीस कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनूरी तालुक्यातील (जि.हिंगोली) इसापूर धरण उजवा कालवा परिसरातील वृक्षांची अधिकारी व कत्रांटदार यांनी संगणमत करुन केलेली अवैध वृक्ष तोड**

**(१३) ५६३१ (०६-०४-२०१५). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनूरी तालुक्यातील (जि.हिंगोली) इसापूर धरण उजवा कालवा परिसरातील वृक्षांची अधिकारी व कत्रांटदार यांनी संगणमत करुन लाखो रुपये किंमतीचे वृक्षांची तोड करुन निविदा काढत खरेदी-विक्री करीत शासनाची आर्थिक लुबाडणूक करण्यात आली असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधितावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील अपुर्ण सिंचन प्रकल्पाबाबत**

**(१४) ५६९५ (०६-०४-२०१५). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील काही सिंचन प्रकल्पाचे बांधकाम ७५ टक्क्यापर्यंत पूर्ण करण्यात आले आहे अशा सिंचन प्रकल्पास वाढीव निधी देवून ते पूर्ण करण्यात येणार आहेत त्याचप्रमाणे ज्या काही सिंचन प्रकल्पाचे बांधकाम दहा टक्यापर्यंत करण्यात आले आहे अशा सिंचन प्रकल्पासाठी वाढीव निधी देण्यात येणार नसून ते पूर्ण करण्यात येणार नसल्याचा शासनाने निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ७५ टक्यापर्यंत पूर्ण करण्यात आलेले सिंचन प्रकल्प किती व कोणते तसेच १० टक्यापर्यंत काम करण्यात आलेले प्रकल्प किती व कोणते आहेत व १०२ टक्यापर्यंत काम करण्यात आलेल्या सिंचन प्रकल्पाचे काम ७५ टक्यापर्यंत पूर्ण करण्यात आलेल्या सिंचन प्रकल्पाप्रमाणे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०५-२०१५) :** (१) विदर्भातील ७५ टक्के पेक्षा जास्त खर्च झालेले तसेच अनुशेषनिर्मुलन कार्यक्रमांतर्गतचे सर्व प्रकल्प पुर्ण करण्यास तसेच सिंचन क्षमता व पाणीसाठा निर्माण होणाऱ्या प्रकल्पांना प्राधान्य देण्याचे धोरण शासनाने ठरविले आहे. ज्या प्रकल्पांचे काम १० टक्क्यापर्यंत झाले आहे. अशा प्रकल्पांना निधी न देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला नाही.
(२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील सन २०१४-१५ मध्ये अर्थसंकल्पित १९८ प्रकल्पांपैकी ४२ प्रकल्प (६ मोठे, १६ मध्यम व २० लघु) ७५ टक्के पेक्षा जास्त खर्च झालेले आहेत. तसेच ४३ प्रकल्प (२ मोठे, ८ मध्यम व ३३ लघु) १० टक्के पेक्षा कमी खर्च झालेले आहेत. सिंचन अनुशेष निर्मुलनाचे सर्व तसेच ७५% पेक्षा जास्त खर्च झालेल्या प्रकल्पावरील अडचणी सोडवून तसेच राज्याच्या आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांचे निदेशानुसार निधी उपलब्ध करुन प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रस्तावित संरचना विकास योजने अंतर्गत विदर्भासाठी कमी निधीची तरतूद केल्याबाबत

**(१५) ५६९६ (०६-०४-२०१५). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भासाठी ११ जिल्ह्यासाठी प्रस्तावित संरचना विकास योजनेसाठी विदर्भासाठी केवळ ८७९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्यामुळे विदर्भाच्या विकासाला खीळ बसली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भाच्या विकास कामासाठी वाढीव निधीचा वा तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१५) :** (१) नियोजन विभागांतर्गत अशी योजना प्रस्तावित नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भातील ग्रामसेवकांच्या कामात राजकीय हस्तक्षेप वाढत असल्यामुळे ग्रामसेवकांच्या आत्महत्येत वाढ होत असल्याबाबत**

**(१६) ५६९९ (०६-०४-२०१५). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील ग्रामसेवकांच्या कामात राजकीय हस्तक्षेप वाढत असल्यामुळे त्यांच्यात मानसिक तणाव मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे दिवसेंदिवस ग्रामसेवकांच्या आत्महत्येत वाढ होत असल्यामुळे ग्रामसेवकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ग्रामसेवकांवर कामाचा वाढत असलेला ताण कमी करण्याबाबत तसेच त्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०५-२०१५) :** (१) राजकीय हस्तक्षेपामुळे मानसिक तणाव वाढून आत्महत्या झाल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधूदुर्ग जिल्हयातील शेतक-यांनी पिकविलेल्या भात खरेदी केला नसल्याबाबत**

**(१७) ५७१८ (१०-०४-२०१५). श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधूदुर्ग जिल्हयातील शेतक-यांनी पिकविलेल्या भात यावर्षी शासनाने खरेदी केला नसल्याने दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भात खरेदीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) शासनाच्या दि. ३०.१०.२०१४ च्या शासन निर्णयानुसार हंगाम २०१४-१५ मधील धान खरेदीबाबत आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यात २६ धान खरेदी केंद्रांना मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी २ केंद्रांवर धान खरेदी सुरु करण्यात आली असून २१६.६४ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे.

---

**मत्स्य विद्यापीठ कोकणातील समुद्रकिनारपट्टीच्या प्रदेशात**
**सुरु करुन कोकणवासींयाना न्याय देण्याबाबत**

**(१८) ५८१२ (०४-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात एकूण मत्स्यउत्पादनापैकी ७२ टक्के उत्पादन कोकणात होत असताना मत्स्य विज्ञान विद्यापीठ कोकण किनारपट्टीपासून दोन हजार कि.मी. अंतरावरील नागपूरच्या पशुविज्ञान विद्यापीठाला जोडण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.भालचंद्र मुणगेकर समिती निर्णय देईल त्या ठिकाणी वर्षभरात कोकणात मत्स्यविज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यात येईल असे आश्वासन शासनामार्फत देण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोकणात मत्स्यविज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) महाराष्ट्र मत्स्यविज्ञान व सागरी विज्ञान विद्यापीठ रत्नागिरी येथे स्थापन करण्याबाबत डॉ.भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटाने सादर केलेल्या शिफारशींची, मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन व वित्त विभागाचे सचिव तसेच अन्य संबंधित विभागाच्या सचिवांचा समावेश असलेल्या समितीमार्फत छाननी करुन सविस्तर अहवाल सादर करणेबाबत तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने दिनांक २२/८/२०१४ रोजी समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीची बैठक दिनांक ९/३/२०१५ रोजी झाली असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तापी पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत सुलवाडे-जामफळ-कानोली (जि.धुळे)**
**उपसासिंचन योजनेस निधीची उपलब्धता नसल्याबाबत**

**(१९) ५८३१ (०६-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत सुलवाडे-जामफळ-कानोली (जि.धुळे) उपसासिंचन योजनेस सन १९९९ साली प्रशासकीय मान्यता मिळाली असून सप्टेंबर, २०१२ अखेर पर्यंत योजनेच्या सर्वेक्षण, संकल्पना, वन जमिन संपादन इत्यादी बाबींवर ८ कोटी ९२ लाख रुपये खर्च झाले आहे, परंतु पुढील भौतिक कामासांठी सदर योजनेत निधीची उपलब्धता नसल्याने

काम रेंगाळून पडली आहेत असे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबतीत काही धोरण ठरविणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) माहे जानेवारी, २०१५ अखरे योजनेवर रु. ७.९५ कोटी खर्च झाला आहे. प्रचलित धोरणानुसार सदर योजनेच्या रु. २०३४.७१ कोटी किंमतीच्या सुधारित प्रकल्प अहवालावर प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खान्देशाच्या विकासास पुरेसा निधी मिळवून देण्याबाबत

**(२०) ५८७३ (०८-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात विदर्भ, मराठवाडा, कोकण विभागाला स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ मिळाले आहे, खान्देश मात्र पश्चिम महाराष्ट्राला (उर्वरित वैधानिक विकास महामंडळाला) जोडला गेला आहे. त्यामुळे खान्देशाच्या विकासासाठी पुरेसा निधी मिळत नसून येथील वेगवेगळ्या विभागाचा अनुशेष ही ९ हजार कोटीच्या पुढे गेलेला आहे असे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, ही गोष्टी खरी आहे काय,

(२) असल्यास, खान्देशाच्या विकासास पुरेसा निधी मिळवून देण्याच्या दृष्टीने व येथील अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने शासन काही धोरणात्मक पाऊले उचलणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीन प्रदेशांकरिता स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. राज्यातील समतोल प्रादेशिक विकासासाठी गठित करण्यात आलेल्या डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी विधीमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आला. समितीच्या अहवालात नाशिक जिल्ह्यातील प्रतिनिधींची मते अंतर्भूत आहेत. समितीचा अहवाल स्वीकारण्यासंदर्भात शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१५ अन्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. समितीच्या अहवालातील शिफारशी प्रशासकीय विभागांचे त्यावरील अभिप्राय विचारात घेऊन, शिफारशी स्विकारण्या संदर्भात उपसमितीने आपला अहवाल मंत्रिमंडळास सादर करावयाचा आहे.

---

## शेगांव (जि.बुलढाणा) येथील गजानन महाराज या तीर्थक्षेत्राचा मंजूर

**करण्यात आलेला विकास आराखडयाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२१) ५९०० (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव (जि.बुलढाणा) येथील गजानन महाराज या तीर्थक्षेत्राचा मंजूर करण्यात आलेल्या विकास आराखड्यासाठी किती निधीची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे,

(२) असल्यास, सदर विकास आराखड्याच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदरहू तिर्थक्षेत्राच्या विकास आराखड्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०१५) :** (१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र,तिक्षेवि-२००९/प्र.क्र.८०/का-१४४४, दि. ८ मार्च, २०१० अन्वये रु.३६०.४० कोटींचा शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. सदर आराखड्यांतर्गत महाराष्ट्र शासनाचा सहभाग रु.२५०.०० कोटी, केंद्र शासनाचा सहभाग रु.३१.०० कोटी नगरपरिषद शेगांवचा सहभाग रु.१३.९० कोटी आणि श्री.गजानन महाराज संस्थांनाचा सहभाग रु.६५.५० कोटी इतका आहे.

सदर आराखड्याची अंमलबजावणी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या मार्फत करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या रु.२५०.०० कोटीच्या शासन सहभागापैकी मार्च, २०१५ अखेर एकूण रु.२४८.३९ कोटी निधी विभागीय आयुक्त, अमरावती यांना वितरीत करण्यात आला असून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात या आराखड्यासाठी रु.५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

(२) सदर आराखड्यांतर्गत विभागीय आयुक्त, अमरावती यांनी मार्च, २०१५ अखेर एकूण रु.२४४.३२ कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून कार्यान्वयीन यंत्रणांना एकूण २१५.९१ कोटी निधी वितरीत केला आहे. सदर आराखड्यांतर्गत कामांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ) पूर्ण झालेली कामे - रु.६१.०३ कोटी

ब) प्रगतीपथावर असलेली कामे - रु.१३९.०७ कोटी

क) निविदा स्तरावरील असलेली कामे - रु.४३.१० कोटी

ड) संकल्पना / अंदाजपत्रक स्तरावरील असलेली कामे - रु.६.८० कोटी.

एकूण रु. २५०.०० कोटी

(३) शेगांव तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे पूर्ण करण्यासाठी नियोजन विभागाच्या शासन निणर्य, क्र.तीक्षेवि-२०१२/प्र.क्र.२४/का-१४४४, दि.२९.१०.२०१४ अन्वये आराखड्यास जून, २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामांना गती देण्याच्यादृष्टीने नियोजन विभागामार्फत, तसेच विभागीय आयुक्त, अमरावती तथा जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्यामार्फत वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात येतात. आराखड्यातील कामांना गती मिळण्याच्या दृष्टीने उपविभागीय अधिकारी (महसूल), खामगांव, जि.बुलढाणा वेळोवेळी कामनिहाय सविस्तर

आढावा घेतात. या बैठकीत विविध यंत्रणांच्या प्रत्यक्ष उद्‌भवणा-या अडचणींबाबत समन्वय साधण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असलेल्या कर्मचा-यांना सेवेत असताना मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याबाबत**

**(२२) ५९०६ (०६-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. डी.एस.अहिरे (साक्री), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असलेल्या कर्मचा-यांना सेवेत असताना मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचे सुमारे १७२ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपाचे प्रस्ताव रखडल्यामागील कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ठाणे जिल्हा परिषदमध्ये अनुकंपा तत्त्वावर वारसांना नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) दिनांक २६/०१/२०१४ रोजी प्रसिध्द केलेल्या अनुकंपा जेष्ठता प्रतिक्षायादीतील ठाणे जिल्ह्यातील १७२ प्रस्तावापैकी सन २०१३ मध्ये १४ व सन २०१४ मध्ये ४६ अशा एकूण ६० उमेदवारांना नियमानुसार उपलब्ध जागांवर नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

या व्यतिरिक्त जून २०१४ नंतर आज अखेर अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी ७२ अपूर्ण स्वरुपातील प्रस्ताव प्राप्त झालेले असून याबाबतच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन हे प्रस्ताव नियमित सेवाज्येष्ठता यादीत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

शासन नियमानुसार सरळसेवेच्या पदावर जेष्ठतासूचीतील क्रमवारीनुसार उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही पद उपलब्धतेनुसार करण्यात येत आहे.

---

**नाशिकच्या जिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन नवीन वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची केलेली मागणी**

**(२३) ५९२२ (०९-०४-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रिय आरोग्य मंत्रालयाने जिल्हा रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करुन देशात ५८ नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यामुळे सदर योजनेद्वारे नाशिकच्या जिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन नवीन वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रस्तावित सात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये पुर्णत: कार्यान्वित होत नाहीत तोपर्यंत नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे संयुक्तिक ठरणार नाही, असा निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगर व श्रीगोंदा तालुक्यांना (जि.अहमदनगर) वरदान ठरणारी साकळाई योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) ६०४० (०६-०४-२०१५). श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील नगर व श्रीगोंदा तालुक्यांना वरदान ठरणारी साकळाई योजनेचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीगोंदा व नगर तालुक्यातील शेतक-यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी नगर-दौन्ड महामार्गावर चिखली टोलनाक्यावर रस्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, साकळाई पाणी योजनेचे काम व्हावे म्हणून परिसरातील शेतकरी मागील २० वर्षापासून शासनाकडे मागणी करत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, साकळाई पाणी योजनेचे काम पूर्ण होणेबाबत शासनस्तरावरून केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) होय.

(३) होय.

(४) कुकडी प्रकल्पात उपलब्ध असलेल्या संपूर्ण पाण्याचे नियोजन या पूर्वीच झाले असल्याने व या योजनेसाठी पाणी उपलब्ध नसल्याने सदर योजना करता येत नाही.

---

**ससून डॉकमधील मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीची गोडऊन राज्य शासनाच्या महाराष्ट्र मत्स्य विकास महामंडळ (MFDC) मार्फत मच्छिमारांना भाड्याने देण्यात आल्याबाबत**

**(२५) ६०७६ (०४-०४-२०१५). श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ससून डॉक मधील मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीची गोडाऊन नं.१७७३ व १५८ राज्य शासनाच्या महाराष्ट्र मत्स्य विकास महामंडळ (MFDC) मार्फत मच्छिमारांना भाड्याने देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छिमारांनी म.म.वि.मं. (MFDC) ला वेळोवेळी जागेचे भाडे भरुनही सदर भाडे मुंबई पोर्ट ट्रस्टला (BPT) न भरल्यामुळे सदर गोडाऊन सहा महिन्याच्या आत रिक्त करण्यास सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशाला साधारण ५०० ते ८०० करोडोपर्यंत परकीय चलन मिळून देणा-या मच्छिमार व त्यासंबंधित असणारे व्यावसायिक व कामगार यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची निवेदने मा.मुख्यमंत्री, मा.मत्स्य विकास मंत्री, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास मंडळ यांना लेखी निवेदने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने निवेदनावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) नाही.

ससून गोदी येथील मुंबई पोर्ट ट्रस्टचे मालकीचे गोडावून क्र.१७७३ व १५८ मुंबई पोर्ट ट्रस्टने सन १९५१ पासून केंद्र शासनास भाडे तत्वावर दिले होते. केंद्र शासनाने सदर गोदामे सन १९६९ मध्ये मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई (डायरेक्टर ऑफ फिशरिज) यांना हस्तांतरित केले होते. सन १९६९ साली मत्स्यनिर्याती पासून देशाला मिळणा-या परकिय चलनात वाढ व्हावी या उद्देशाने सदर गोडावून मधील जागा मत्स्य प्रक्रिया करणा-या व्यवसायिकांना मत्स्यव्यवसाय संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी भाडे तत्वावर देण्यात आलेल्या आहेत.

(२) नाही.

मुंबई पोर्ट ट्रस्टने गोदामांतील जागांची सन १९८९ पासून अवास्तव भाडे वाढ केल्याने सदर भाडे वाढ गोदामातील मत्स्यव्यवसायिक तसेच महामंडळास मान्य नव्हती. त्यामुळे मत्स्यव्यवसायिकांनी वाढीव भाडे भरणा करण्यास सन १९८९ पासून नकार दिला. यामुळे मुंबई पोर्ट ट्रस्टचे भाडे थकीत राहिले.

अशा प्रकारच्या भाड्यामुळे येणारी थकबाकी मिळावी म्हणून, मुंबई पोर्ट ट्रस्टने संपदा अधिकारी यांच्या न्यायालयात सन १९९९ मध्ये दावा दाखल केला. सदर दावा दाखल केल्यापासून सदर गोदामातील मत्स्यव्यवसायिकांनी महामंडळाकडे भाडे भरणा करणे बंद केले. सदर दाव्यात संबंधीत मत्स्यव्यवसायिक प्रतिवादी म्हणून मुंबई पोर्ट ने सामावून घेतले होते. मत्स्यव्यवसायिकांनी भरणा केलेली रक्कम मुंबई पोर्ट ट्रस्ट कडे जमा केलेली आहे.

गोदामे रिकामे करणेबाबतीत दिनांक १६/१०/२०१४ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात प्रथमतः मत्स्यव्यवसायिकांनी (महामंडळास कोणतीही सुचना अथवा माहिती न देता) स्वतंत्र अपिल दाखल केले असे सर्वोच्च न्यायालयात समजले. सदर अपिल सुनावणीसाठी आले असता मत्स्यव्यवसायिकांनी सर्वोच्च न्यायालयाला गोडावून रिकामी करुन देण्यासाठी ६ महिन्यांची मुदत मागितली या निकालानंतर महामंडळाने दाखल केलेल्या अपिलावरील सुनावणी मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक १६/१०/२०१४ रोजी आली असता मा.सर्वोच्च न्यायालयाने पुढील ६ महिन्यात दोन्ही गोदामे खाली करण्याचा निर्णय दिला.

(३) मुंबई पोर्ट ट्रस्टने महामंडळास दिलेल्या मासिक देयकानुसार आकारलेली रक्कम रु.६.३८ कोटी मत्स्यव्यवसायिकांकडून येणे आहे व मुंबई पोर्ट ट्रस्टला महामंडळास रक्कम रु. ६.५६ कोटी ऐवढे देणे आहे परंतु सदर वाढीव भाडे दर प्रकरण अजूनही न्याय प्रविष्ठ असल्याने याबाबतचा अंतिम निर्णय झालेला नाही. त्यामुळे आकारलेले भाडे मत्स्यव्यवसायिकांनी वेळच्यावेळी न भरल्याने सदर प्रसंग निर्माण झालेला आहे. सदर मत्स्यव्यवसायिक हे मत्स्य निर्यातदार असून त्यांचेवर उपासमारीची वेळ येईल असे म्हणणे विसंगत वाटते.

(४) होय

(५) महामंडळाने केलेली कार्यवाही मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार जरी दिनांक १४/१०/२०१४ रोजी ससून डॉक मधील गोदामे खाली करण्याचा निर्णय झाला असता तरी शासनाकडून केंद्र शासनास येथील मत्स्यव्यवसायावर प्रतिकुल परिणाम होवून नये यासाठी मा.मंत्री, (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य यांनी केंद्रिय कृषि मंत्री यांना दिनांक ०१/१२/२०१४ रोजी विनंती करुन मत्स्यव्यवसायाच्या दृष्टीने या महत्वाच्या प्रकरणी लक्ष घालण्याचे व उच्चस्तरीय बैठक बोलविणे बाबत विनंती केली आहे.

राज्य शासन या मुद्यावर केंद्र शासनाकडे गांभिर्याने पाठपुरावा करीत आहे. तसेच राज्य शासनाकडून ससून गोदी बंदराचे नुतनीकरण व आधुनिकीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आलेला आहे. राज्य शासनाचे सकारात्मक प्रयत्न चालू आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा येथे मेडीकल कॉलेजसाठी निधी उभारुन कॉलेज सुरु करण्याबाबत**

**(२६) ६१२७ (०९-०४-२०१५). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथे मेडीकल कॉलेज उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर कॉलेजसाठी निधी उभारुन कॉलेज सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) सातारा येथील प्रस्तावित महाविद्यालयाचा प्रस्ताव भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडे सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुका पंचायत समितीची इमारतीबाबत**

**(२७) ६२२४ (०८-०४-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुका पंचायत समितीची इमारत सन १९७२ मध्ये बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समितीचे काही विभाग स्वमालकीच्या इमारतीमध्ये तर काही विभाग हे भाडयाच्या खोलीत असून या भाडयापोटी जिल्हा परिषदेला दरमहा रुपये १५ हजार मोजावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व विभाग एकाच इमारतीमध्ये आणणारा पंचायत समितीच्या इमारतीचा आराखडा दहा वर्षापूर्वी तयार करुन प्रस्ताव सादर करण्यांत आला होता, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) राजापूर पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याचा ११ व्या वित्त आयोगातून प्रस्तावित करण्यात आलेला प्रस्ताव त्यावेळी मंजूर झाला नाही.

आता, अस्तित्वातील बांधकामाच्या निर्लेखनाची कार्यवाही करणे, तसेच नियोजित

बांधकामाची जागा जिल्हा परिषदेच्या नावे करुन सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेकडून प्रगतीत आहे.

---

**मोहोळ तालुक्यातील (जि. सोलापूर) आष्टी उपसा सिंचन योजना अद्याप अपूर्ण असल्याबाबत.**

**(२८) ६२३४ (०७-०४-२०१५). श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ तालुक्यातील (जि. सोलापूर) आष्टी उपसा सिंचन योजनेच्या कामास सन १९९६ मध्ये सुरूवात करून अद्याप योजनेचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने मोठ्या प्रमाणात क्षेत्र ओलितापासून वंचित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकल्प तातडीने करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

निधीच्या उपलब्धतेनुसार सदर योजनेची कामे प्रथतीपथावर आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलींचे शिक्षण आणि विवाहासाठी अल्प बचत सुकन्या समृध्दी योजनेबाबत**

**(२९) ६३१६ (०८-०४-२०१५). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलींच्या शिक्षण आणि विवाहासाठी अल्पबचतीला प्रोत्साहन देण्यासाठी सुकन्या समृध्दी खाते व विशेष गुंतवणूक योजनेत राज्यातील १० जिल्हयांचा समावेश करण्यात आला असून दरहजारी ९१८ पेक्षा कमी दर असलेल्या या जिल्हयांमध्ये सन २०१५ मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी विशेष मोहिम राबविली जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलींच्या नावावर उघडलेल्या समृध्दी खात्यावर ९.१ व्याजदर आणि करबचत प्रस्तावित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्हयांत मुलींचा घटता जन्मदर लक्षात घेऊन समाजातील लिंग

गुणोत्तराचे विषम प्रमाण लक्षात घेवून शासनाने निर्णय घेवून उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०५-२०१५) :** (१) "बेटी बचाओ-बेटी पढाओ" या केंद्र पुरस्कृत अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्यातील १० जिल्हयांची निवड करण्यात आली असून सदर जिल्हयांकडून अभियानांतर्गत सन २०१४-१५ ते २०१६-१७ पर्यंत घ्यावयाचे कार्यक्रमाबाबत भौतिक व आर्थिक आराखडा केंद्र शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सुकन्या समृध्दी खाते ही विशेष गुंतवणुक योजना "बेटी बचाओ-बेटी पढाओ" अभियानाचा भाग असून ती योजना केंद्र पुरस्कृत आहे. सदर योजना १० वर्षापर्यंतच्या मुलींना लागू आहे. दिनांक १.१२.२०१५ पर्यंत खाते उघडून या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

(२) होय.

(३) व (४) "बेटी बचाओ-बेटी पढाओ" अभियानांतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार महाराष्ट्रातील १० जिल्हयांत खालीलप्रमाणे उपाययोजना सुरु आहे.

अ) लिंगभेदावर आधारित लिंग निवड प्रथा निर्मुलन करणे.

ब) बालिकेच्या जिवीताची हमी घेणे किंवा खात्री असणे.

क) बालिकेच्या शिक्षणाची हमी किंवा खात्री घेणे.

---

**पुणे शहरातील निर्माण होणारा कचरा शहरातच जिरविण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने ५० लाख रुपयांचा निधी दिला असल्याबाबत**

**(३०) ६३२४ (०८-०४-२०१५). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील निर्माण होणारा कचरा शहरातच जिरविण्यासाठी २ ते २० टनापर्यंतचे लहान प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने ५० लाख रुपयांचा निधी देण्यास दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी मंजूरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीमध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने कचरा समस्या सोडविण्यासाठी कचरा प्रकल्प उभारण्यासाठी कुठलीही उपाययोजना शासनाकडे उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील मोठ-मोठ्या शहरातील कचरा त्याच गावामध्ये जिरविण्यासाठी कचरा प्रकल्प उभारावेत यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत मिळावा अशी मागणी पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत वि.स.स. शिरुर यांनी केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामीण भागातील कचरा गावातच जिरविण्यासाठी स्थानिक विकास निधी व जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध होण्यासाठी शासनस्तरावर केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. निर्मल भारत अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या करिता ग्रामपंचायतींना कुटुंब संख्येवर आधारीत अर्थसहाय्य देण्यात येते. या बाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.निर्मल-२०१२/प्र.क्र.२७३/पापु-१६, दि.२१/८/२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जिल्हा वार्षिक योजना व आमदार स्थनिक विकास निधी अंतर्गत ग्रामीण भागातील कचरा गावातच जिरविण्यासाठी निधी देण्यासाठी कोणतीही विशिष्ठ योजना अस्तित्वात नाही.

---

**मनरेगा योजनेवरील खर्चात २० टक्के कपात करण्यात आल्याबाबत**

**(३१) ६३९६ (०६-०४-२०१५). श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरगरिबांसाठी आखलेल्या मनरेगा योजनेवरील खर्चात २० टक्के कपात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खर्चातील कपातीमुळे कोट्यावधी गरीब कुटुंबियांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार केंद्र शासनाने मनरेगा निधीत कपात करु नये म्हणून पाठपुराव्या दाखल कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१५) :** (१) नाही

(२) हे खरे नाही

(३) प्रश्न उद्‌ववत नाही

(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेस केंद शासन पत्येक वर्षी लेबर बजेट मंजूर करते. प्रत्येक्षात राज्यात निर्माण होणा-या मनुष्य दिनाप्रमाणे क्रेंद शासनाकडून निधी प्राप्त होतो

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात असलेला रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे नामकरण करुन**

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग निर्माण करण्याबाबत**

**(३२) ६५७२ (०६-०४-२०१५). श्री. सदा सरवणकर (माहिम), श्री. संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात असलेला रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे नामकरण करुन कौशल्य विकास व उद्योजकता विभाग निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागाची कार्यकक्षा काय राहणार आहे व या विभागास स्वतंत्र दर्जाचा प्रधान सचिव देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त नवीन विभाग किती कालावधीत कार्यान्वीत करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१५) :** (१) होय,

(२) सदर नवनिर्मित विभागासाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१५/०१/२०१५ अन्वये स्वतंत्र दर्जाचे प्रधान सचिवांचे पद विभागास देण्यात आलेले आहे. या विभागामार्फत राज्यातील बेरोजगार उमेदवारांचे कौशल्य विकसित करण्यासाठी व त्यांना विविध रोजगारांच्या संधीचा फायदा घेण्यास रोजगारक्षम व स्वयंरोजगारक्षम बनविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जाणार आहेत.

(३) उक्त नवीन विभाग हा पूर्वीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे नामकरण करुन निर्माण झालेला असल्याने तो शासन निर्णयाच्या दिनांकापासून कार्यान्वित आहे.

---

**सिंधुदूर्ग जिल्हातील पारंपारिक मच्छिमारांचे पर्यटन गाव या योजनेस मंजुरी मिळण्याबाबत**

**(३३) ६५७४ (०६-०४-२०१५). श्री. सदा सरवणकर (माहिम), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आल्यानंतर शासनाने त्या दृष्टीने पर्यटन करण्यासाठी आतापर्यंत समुद्रकिना-याजवळील किती गावांचा समावेश केला आहे व किती जमीन संपादित केली आहे,

(२) असल्यास, मासेमारीबरोबर पर्यटन व्यवसायाचे नवे दालन निर्माण व्हावे व पर्यटकांनाही नव्या पर्यटन स्थळांचा आनंद लुटता यावा यासाठी जिल्ह्यातील पारंपारिक मच्छिमारांनी मच्छिमारांचे पर्यटन गाव ही योजना शासनाकडे मान्यतेसाठी पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पारंपारिक मच्छिमारांचे पर्यटन गाव या योजनेस मंजुरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१५) :** (१) सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित

केल्यानंतर पर्यटन विकासासाठी या जिल्ह्यात भूसंपादन अधिनियम १८९४ मधील तरतुदीनुसार आतापर्यंत एकुण १७५.६५ हे.आर. जमीन संपादीत करण्यात आली असून यामध्ये समुद्र किना-या जवळील ८ (आठ) गावांचा समावेश आहे.
(२) असा कोणताही प्रस्ताव शासनाकडे अद्याप प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या सभांना संचालका वारंवार गैरहजर राहत असल्याबाबत**

**(३४) ६५८० (०९-०४-२०१५). श्री. सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या सभांना वारंवार गैरहजर राहिल्याबद्दल संघाचे संचालकांना महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० च्या कलम ७३ (सीए) अन्वये अपात्र ठरविणा-या नोटीसा सहकार विभागाच्या अप्पर निबंधक यांनी दिनांक २८ जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास पाठविलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नोटीसांच्या अनुषंगाने पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) अद्याप नोटीसीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व उक्त कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०५-२०१५) :**(१) होय. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाकडून प्राप्त प्रस्तावानुसार दि. १६.१.२०१५ रोजी नोटीस निर्गमित करण्यात आलेली होती.
(२) सदर नोटीसींच्या अनुषंगाने दि. ३१.१.२०१५ व १२.२.२०१५ रोजी सुनावण्या घेण्यात आल्या. त्या अनुषंगाने दि. २.३.२०१५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) कार्यवाही केली आहे.

---

**चास-कमान (ता.खेड, जि.पुणे) उजव्या कालव्यात पाणी सोडण्याच्या मागणीबाबत**

**(३५) ६५९७ (०६-०४-२०१५). श्री. सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चास-कमान (ता.खेड, जि.पुणे) उजव्या कालव्यात पाणी सोडण्याची मागणी दोंदे, वडगाव, शिरोली, चांडोली व काळूस आदी गावे आणि वस्त्यांमधील शेतकऱ्यांनी जलसंपदा विभागाकडे अनेक वेळा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उजव्या कालव्यात पाणी सोडण्याबाबत आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) अद्याप मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?
**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

शिरोली, चांडोली, काळूस इत्यादी उजव्या कालव्याच्या शेवटच्या भागातील लाभधारक शेतकऱ्यांनी उजव्या कालव्यात पाणी सोडण्याची मागणी केली आहे.
(२) लाभधारक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार उजव्या कालव्यात रब्बी व उन्हाळी हंगाम सन २०१४-१५ मध्ये आतापर्यंत चार पाणी पाळ्या देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात उपलब्ध असलेली वीज मुंबईत आणण्यासाठी पुरेशा वीज वाहिन्याच नसल्याबाबत**

**(३६) ६६३२ (३०-०४-२०१५). श्री. जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री. सुभाष साबने (देगलूर), श्री. अजय चौधरी (शिवडी), श्री. अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री. मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री. संजय पोतनीस (कलिना), श्री. संदीपानराव भुमरे (पैठण), श्री. राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराला रिलायन्स आणि टाटा पॉवर सध्या दोन हजार मेगावॅट वीज स्वतः उभारलेल्या वीज वाहिन्यांच्या माध्यमातून पुरवते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कंपन्यांच्या प्रकल्पामध्येच तांत्रिक बिघाड झाला तर पर्यायी व्यवस्था म्हणून राज्यात उपलब्ध असलेली वीज मुंबईत आणण्यासाठी पुरेशा वीज वाहिन्यांचा नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात प्राध्यापक खापर्डे यांच्या वतीने दिलेला अहवाल तीन वर्षे शासनाकडे प्रलंबित असून त्यावर शासनाने कोणताच निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व या अहवालावर निर्णय घेण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०५-२०१५) :** (१) होय.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) व (४) प्राध्यापक खापर्डे यांच्या समितीने केलेल्या बहुतांश अल्पकालीन शिफारशी अंमलात आणल्या असून दिर्घकालीन स्वरुपातील पारेषण क्षमता वाढविण्यासाठी प्रकल्पांची अंमलबजावणी प्रगतीपथावर आहे.

---

**रिलायन्स वीज कंपनीकडून टाटाच्या विरोधात केंद्रीय विद्युत अपीलीय लवादाकडे (एमईआरसी) दाखल केल्याबाबत**

**(३७) ६६४५ (३०-०४-२०१५). श्री. सुनिल शिंदे (वरळी), श्री. सदा सरवणकर (माहिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी दुस-या वीज पुरवठादार

कंपनीच्या वीज यंत्रणेच्या वापराप्रकरणी रिलायन्स वीज कंपनीकडून टाटाच्या विरोधात केंद्रीय विद्युत अपीलीय लवादाकडे (एमईआरसी) दाखल केलेल्या याचिकेवर टाटाला स्वतंत्र वीज यंत्रणा उभारण्याची आवश्यकता नाही असा निर्णय माहे नोव्हेंबर, २०१४ वा त्या सुमारास केंद्रीय विद्युत अपीलीय लवादाने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने बड्या वीज ग्राहकांसह ० ते ३०० युनिटपर्यंच्या वीज ग्राहकांनाही वीज पुरवठा करावा असा निर्णय टाटा वीज कंपनीला युनिटपर्यंतच्या वीज ग्राहकांनाही वीज पुरवठा करावा असा निर्णय टाटा वीज कंपनीला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) आयोगाच्या आदेशानुसार टाटा पॉवर कंपनीने ऑगस्ट, २०१४ ते मार्च २०१५ पर्यंत ७२९६६ नवीन घरगुती ग्राहकांना वीज पुरवठा केला असून ११५९ नवीन वाणिज्यक व १५ औद्योगिक ग्राहकांनाही वीज पुरवठा केला आहे. वरील कालावधीत टाटा पॉवर कडून १६५९ वाणिज्यिक ग्राहक व २४३ औद्योगिक ग्राहक रिलायन्सकडे वर्ग झाले आहेत.

---

**कल्याण शहरातील पूर्व भागात मंजूर शिधावाटप कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(३८) ६६५१ (०७-०४-२०१५). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण शहराची वाढती लोकसंख्या व शहराचा विस्तार मोठा असल्याने पुर्वेस शिधावाटप कार्यालय मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालय सुरु करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी, आयुक्त, जिल्हाधिकारी, शिधावाटप अधिकारी यांना वारंवार पत्रव्यवहार करुनही कार्यालय सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०५-२०१५) :**(१) नाही.

(२), (३) व (४) मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राकरिता महानगरपालिका क्षेत्रातील कार्यालयांची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**जालना येथील जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता, शाखा**

**अभियंत्याविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्याबाबत**

**(३९) ६७३० (०७-०४-२०१५). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथील जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता, शाखा अभियंत्याविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांची मान्यता देण्याबाबतच्या जलसंपदा विभागाच्या विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) निर्णय अद्याप घेतला नसल्यास या प्रकरणी होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०५-२०१५) :**(१) होय.

(२) श्री.रघुवीर गणपतराव यादव, कार्यकारी अभियंता व श्री.रामेश्वर अंबादास कोरडे, तत्का. शाखा अभियंता (उप विभागीय अधिकारी) यांचेविरुध्द मौजे पापळ पाझर तलाव क्र.८ मध्ये झालेल्या अनियमिततेबाबत पोलीस ठाणे टेंभुर्णी, जि.जालना येथे गु.र.नं.२०१४/३६ तसेच श्री.रघुवीर गणपतराव यादव, कार्यकारी अभियंता व श्री.श्रीनिवास बालाजी काळे, शाखा अभियंता यांचेविरुध्द दाभाडी पाझर तलाव क्रमांक ५ मध्ये झालेल्या अनियमिततेबाबत पोलीस ठाणे बदनापूर, जि.जालना येथे गु.र.नं.९२/२०१४ अन्वये गुन्हा दाखल झाल्यामुळे त्यांचेविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास दिनांक ८.०५.२०१५ च्या आदेशान्वये मंजूरी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात औद्योगिक विकासाला चालना देण्याबाबत**

**(४०) ६७४५ (१०-०४-२०१५). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने मंत्रीमंडळ उपसमितीची स्थापना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीचे सर्वसाधारण स्वरूप व कार्यक्रमाची रूपरेषा काय आहे,

(३) असल्यास, सदर समितीच्या दिनांक ३१ मार्च, २०१५ अखेर किती बैठका घेण्यात आल्या व त्यामध्ये घेण्यात आलेल्या नियमाचे स्वरूप काय आहे व बैठकीत समिती सदस्यांची उपस्थिती किती होती ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०५-२०१५) :** (१) होय,

राज्यात औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या सचिवांची शक्तीप्रदान समिती गठीत करण्यास शासन निर्णय क्रमांक मेइम-२०१४/प्र.क्र.८८/उद्योग-८, दि.०८.०१.२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) राज्यातील उद्योगांना लागणारे विविध परवाने / संमती यांची संख्या व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यासाठी अस्तित्वातील कायद्यांमध्ये काही सुधारणा सुचविणे व काही कायद्यांतील तरतुदीची बाधा येत असल्यास असे कायदे निरसित करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती स्थापन करण्यात आली आहे.

(३) दि.१५.०१.२०१५ रोजी समितीची बैठक झाली असून सदर बैठक आढावा बैठक असल्यामुळे नियम तयार करण्यात आले नाही. बैठकीस सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

---

**नवी मुंबई येथील न्यायालय इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४१) ६८६५ (०८-०४-२०१५). श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई स्वतंत्र न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय होऊनही व त्यासाठी सिडकोने भूखंड उपलब्ध करुन दिलेला असतांना इमारतीच्या बांधकामासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्यापी कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१५) :** (१) नाही. सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई येथील न्यायालयीन इमारत बांधकामाकरिता विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दि. ०४/०६/२०१२ अन्वये रु. २८.०७.०२.२३३/- इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामासाठी चालू आर्थिक वर्षात आतापर्यत रु. ११०९.५७ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सदर कामासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रु १००० लक्ष इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. उर्वरित निधी सन २०१५-१६ व २०१६-१७ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील शिधावाटप दुकानदारांनी निकृष्ट दर्जाचे धान्य न स्वीकारल्याने**

**त्यांच्यावर करण्यात आलेली निलंबनाची कारवाई**

**(४२) ६९२९ (०७-०४-२०१५). श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील गोरगरीब रेशन कार्ड धारकांना वाटप करण्यासाठीचे धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याने काही शिधावाटप दुकानदारांनी ते स्वीकारले नाही, त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर दुकानदारांवरील निलंबनाची केलेली कारवाई रद्द करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (११-०५-२०१५) : (**१) हे खरे नाही, अशा प्रकारची बाब निदर्शनास आली नाही. सबब शिधावाटप दुकानदारांवर निलंबन करण्याच्या कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एरोली येथे स्वतंत्र शिधावाटप कार्यालय स्थापन करणेबाबत**

**(४३) ६९३२ (०७-०४-२०१५). श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली विधानसभा मतदार संघासाठी स्वतंत्र शिधावाटप कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेऊन कार्यालयासाठी सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेकडून जागा उपलब्ध करुन घ्यावी अशा सूचना शासनाने दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेने कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देऊ तसे उपनियंत्रक शिधावाटप ठाणे यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देऊनही अद्याप सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय, असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) होय, भाडे तत्वावर जागा उपलब्ध करुन देण्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) नाही, जागा अद्यापि उपलब्ध झालेली नसून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

**नवी मुंबईतील महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंना हक्काची बाजारपेठ**

**उपलब्ध होण्यासाठी विभाग निहाय केंद्रांची उभारणी करण्याबाबत**

**(४४) ६९६५ (०६-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विभागात मोठया संख्येने महिला बचत गट अस्तित्वात असूनही त्यांनी उत्पादित केलेल्या विविध हक्काची बाजारपेठ नसल्यामुळे वस्तुंची विक्री होण्यास अनेक अडचणी निर्माण होतात त्यासाठी हक्काची बाजारपेठ उपलब्ध होण्याकरिता नवी मुंबईत विभागनिहाय केंद्राची उभारणी करण्यात यावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. महिला व बाल कल्याण मंत्री महोदयांना माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्यापी कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१५) :** (१) होय.

(२) सदर निवेदनाद्वारे महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी त्यांना हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून नवी मुंबईत विभागनिहाय केंद्र उभारण्यासाठी सिडकोकडून भूखंड उपलब्ध होणेबाबत विनंती केली आहे. सिडकोकडून भूखंड उपलब्ध करुन देणे हा विषय नगर विकास विभागाच्या अखत्यारित येत असल्याने सदर निवेदन आवश्यक कार्यवाहीसाठी नगरविकास विभागास पाठविण्यात आले असून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मा.सदस्यांना अवगत करण्याची विनंती नगरविकास विभागास केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आजाराशी झुंजणा-या ज्येष्ठ कलाकारांना आरोग्य योजना सुरु करण्याचा प्रस्ताव**

**(४५) ६९८६ (०७-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आजाराशी झुंजणा-या ज्येष्ठ कलाकारांना मदत मिळावी याकरिता आरोग्य योजना सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून सदर प्रकरणी त्वरीत निर्णय घेण्यासाठी मा.मुख्यमंत्री, मा.सांस्कृतिक कार्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी अदयापपर्यन्त कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, ज्येष्ठ कलाकारांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी

विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०५-२०१५) :** (१) ज्येष्ठ कलावंतांसाठी विमा योजना सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत अन्न आयोगाची स्थापना करण्याबाबत**

**(४६) ६९८७ (०७-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत अन्न आयोग स्थापन करण्याचे बंधनकारक असल्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सदर आयोगाची स्थापना करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच राज्यात अन्न आयोगाची स्थापना करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०५-२०१५) :**(१) व (२) होय.
राज्य अन्न आयोगाची स्थापना करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार राज्य अन्न आयोगाची स्थापना करणे बंधनकारक आहे.
(३) व (४) राज्य अन्न आयोगाची स्थापना होईपर्यंत सदर आयोगाचे कामकाज पाहण्यासाठी सचिव (अन्न, नागरी व पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली समिति गठीत करण्यात आली असून राज्य अन्न आयोगाची स्थापनेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील शिधावाटप (३७ फ) कार्यालयांतर्गत असलेल्या शिधावाटप दुकानांमध्ये**

**रॉकेल व इतर साहित्याचा कमी प्रमाणात होणारा पुरवठा**

**(४७) ६९९८ (०७-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शिधावाटप (३७ फ) कार्यालयांतर्गत असलेल्या शिधावाटप दुकानांमध्ये रॉकेल व इतर साहित्य कमी प्रमाणात मिळत असल्याप्रकरणी येथील नागरिकांनी दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास भिवंडी शिधावाटप कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच गोरगरिबांना मुबलक प्रमाणात शिधावाटप करण्यासाठी सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :**(१) जानेवारी, २०१५ या महिन्याचा केरासिन कोटा कमी झाल्याने दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी महिला शिधापत्रिकाधारकांनी ३७ "फ" भिवंडी कार्यालयाच्या आवारात आंदोलन केले होते.

(२) व (३) केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०१५ पासून राज्याच्या आवश्यकतेच्या २८ % इतके केरोसिन नियतन उपलब्ध करून दिले आहे. उपलब्धतेच्या प्रमाणानुसारच शिधापत्रिकाधारकांना केरोसिन वितरित करण्यात आले आहे.

राज्याच्या केरोसिन कोट्यात वाढ करण्याबाबत केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार केला असून, पाठपुरावा सुरु आहे.

---

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपणीचे निवासस्थान असलेल्या सातारा येथील आमणे बंगल्यामध्येही राष्ट्रीय स्मारक करण्याबाबत**

**(४८) ७००९ (०७-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपणीचे निवासस्थान असलेल्या सातारा येथील आमणे बंगल्यामध्येही राष्ट्रीय स्मारक करण्याचा लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात तसेच वारंवार मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१५) :** (१) जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे मागण्याचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार सातारा यांचेकडून भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ४७ प्रमाणे सदर मिळकतीचा ताबा सहायक संचालक, नगर रचना तथापि विशेष भूमीसंपादन अधिकारी सातारा यांचेकडे देणेची कार्यवाही चालू होती. तथापि श्री.लक्ष्मण काळू आमणे रा.सि.स.नं. पेठ सदर बझार, सातारा यांनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन नं.४२६९/१३ अन्वये दावा दाखल करुन स्थगिती आदेश प्राप्त करुन घेतले आहेत. त्यामुळे याप्रकरणी सद्यःस्थितीत पुढील कार्यवाही करता येत नाही.

---

**राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात लागु केलेला स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द करण्याबाबत**

**(४९) ७०१९ (०८-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : ता.प्र.क्र. ८९३ ला दि ९-१२-२०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २५ महानगरपालिका क्षेत्रात लागु केलेला स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द करण्यासंदर्भात शासनाच्या विचाराधीन असलेल्या बाबीवर कोणता निर्णय घेतला आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप निर्णय घेतलेला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच राज्यातील व्यापारी वर्गाकडून एलबीटी भरला जात नसल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती हलाखीची झालेली असल्याने, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१५) :** (१), (२) व (३)
मा.वित्त मंत्री यांनी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये दि.०१ ऑगस्ट, २०१५ पासून स्थानिक संस्था कर रद्द करण्यात येत आहे. अशी घोषणा केली आहे. त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील नवीन आयटी धोरण तयार करण्याबाबतचा निर्णय**

**(५०) ७०४३ (१०-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रमुख शहरांत आयटी क्षेत्र विस्तारीत व्हावे, रोजगार आणि कुशल मनुष्यबळ निर्मिती व्हावी याकरिता नवे आयटी धोरण तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०५-२०१५) :** (१) व (२) माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २००९ चा वाढीव कालावधी दिनांक ३१/०५/२०१५ रोजी संपुष्टात येणार आहे. नवीन धोरणाचे प्रारुप तयार करण्यात आले असून, सदर धोरण अंतिम करण्याची कार्यवाही चालू आहे.

या संदर्भात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित व तज्ञ संस्थांशी विचारविनियम करुन, नवीन माहिती तंत्रज्ञान धोरणाची रुपरेषा ठरविण्यासाठी दिनांक १६/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये कार्यबल समिती गठीत करण्यात आली आहे.

तसेच सदर धोरणाच्या संदर्भात संबंधित विभागाचे प्राप्त अभिप्राय, विचारात घेऊन, मंत्रीमंडळासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला असून, सदर प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवण्यास शासनास सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.